# किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१६/२०२६ मधील
# निशाणी क्र.१ वरील आदेश
(CNR NO. MHPU200002492026)

१. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रे वाचली. तपासी अधिकारी व सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल केले. अर्जदार यांचे विधिज्ञ व सरकारी अभियोक्ता यांचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जदाराने रांजणगाव एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, ता. शिरूर, जि. पुणे मधील गुन्हा रजि. क्र.४६६/२०२५ मधील जप्त केलेला मुददेमाल म्हणजेच हिरो होंडा मोटार लि. कंपनीची स्पलेंडर प्लस मोटारसायकल याचा वाहन क्र. एम.एच. १६–ए.एन.–८१७२ हे जप्त वाहन परत मिळणेसाठी अर्ज केला आहे.

३. अर्जदाराचे सन्माननीय विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचे जप्त वाहन अर्जदाराच्या मालकीचे आहे. सदरचे वाहन हे पोलिस ठाणे, रांजणगाव एम. आय.डी.सी. येथे बंद स्थितीत एकाच जागी पडुन असल्याने खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरील वाहनाचे नुकसान होउन अर्जदाराचे आर्थिक नुकसान होईल. अर्जदाराने जप्त मुददेमाल त्यांना परत दिल्यास त्याची कुठेही विल्हेवाट लावणार नाही. तसेच तिची विक्री सुध्दा करणार नाही. तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार सदरचा मुददेमाल हजर करण्यास तयार आहे. सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केले आहे.

४. सरकारी अभियोक्ता यांनी मुळ कागदपत्रांची पडताळणी करून योग्य त्या अटी व शर्तीचे पालण करून न्यायाचे हुकूम होणेबाबत विनंती केलेली आहे.

५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदाराने सदर अर्जाच्या पुष्टयर्थ शपथपत्र दाखल केलेले असुन सदरचे मुददेमाल वाहन त्यांच्या मालकीचे असल्याचे कथन केले आहे. तसेच अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ प्रथम खबर अहवालाची प्रत, अर्जदाराचे आधारकार्डची प्रत, जप्त वाहनाची विमापत्राची प्रत आणि आर.सी.बुकची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदरील मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. सरकारी अभियोक्ता व तपासी अधिकारी यांनी जप्त

वाहन हे मुळ मालकास योग्य व लायक अटी व शर्तीवर देण्यास हरकत नसलेबाबत कथन केलेले आहे.

**६.** सदर गुन्हयाच्या फौजदारी प्रकरणाचा अंतिम निकाल होण्यास बराच वेळ लागणार आहे. त्यामुळे सदरचा जप्त मुददेमाल अंतिम निकालापर्यंत जप्त ठेवणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच सदरील मुददेमाल हा पोलीस ठाण्यात असल्याने त्याचेवर वातावरणाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच सदरचा मुद्देमाल पोलीस ठाण्यात बंद अवस्थेत राहिल्यास त्याची कार्यक्षमता नष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा मुद्देमाल पोलीस ठाण्यात प्रलंबित ठेवण्या ऐवजी अर्जदाराचे ताब्यात देणे उचित होईल. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या '**सुंदरभाई देसाई विरूध्द गुजरात सरकार (२००२) सुप्रिम कोर्ट केसेस २८३** या खटल्यातील निर्देशानुसार अशा प्रकारच्या जप्त मुद्देमालाची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सदरचा मुददेमाल अर्जदार यांना योग्य ते बंधपत्र घेवून व योग्य त्या अटी शर्तीनुसार परत करणे न्यायोचित ठरेल.

**७.** उपरोक्त विवेचनानुसार निम्नलिखीत आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: आ दे श ::**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. पोलिस ठाणे रांजणगाव (एम.आय.डी.सी.), ता. शिरूर, जि. पुणे मधील गुन्हा रजि. क्र.४६६/२०२५ मधील जप्त केलेला मुददेमाल म्हणजेच वाहन क्र. **एम.एच.१६–ए.एन.–८१७२** हे जप्त वाहन अर्जदार नामे **कैलास माणिकराव ब्राम्हणे** यांना **रक्कम रू.१,००,०००/– (अक्षरी रक्कम रूपये एक लाख मात्र)** इतक्या रकमेच्या सुपुर्दनाम्यावर परत करण्यात यावी.

३. संबंधीत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना असे निर्देशित करण्यात येते की, सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास देतांना वाहनाच्या मालकीबाबतची मुळ कागदपत्राबाबतची पडताळणी करण्यात येवुन जप्त वाहन परत करतांना त्याचा विस्तृत पंचनामा करावा व छायाचित्रे घ्यावीत.

४. अर्जदाराने सदर खटल्याचा अंतिम निकालापर्यंत मुददेमालाच्या स्वरूपात कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचा नाही किंवा त्याची विक्री करण्याची नाही.

५. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सदरचा मुद्‌देमाल न्यायालयात हजर करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

६. अर्जदार यांनी सदरील मुददेमालाचा वापर कोणताही गुन्हा करण्यासाठी करण्याचा नाही.

७. संबंधीत तपासीक अंमलदार यांना आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदाराने दिलेला सुपुर्दनामा दोषारोप—पत्रासोबत न्यायालयात हजर करावा.

८. आदेशाची पुर्तता झाल्याचा विस्तृत अहवाल न्यायालयात दाखल करावा.

Digitally signed by DOMALE DATTATRAYA BHAUSAHEB
Date: 2026.03.09 17:44:54 +0530

**(द.भा.डोमाळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे

दिनांक : ०९/०३/२०२६.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय/आदेश फाईल मधील मजकुर हा मुळ न्यानिर्णयातील मजकुराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| कोर्टाचे नाव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता. शिरूर, जि. पुणे. |
| लघुलेखकाचे नाव | : | वि.म. घुंगरड, लघुलेखक श्रेणी – ३ |
| निकालाची तारीख | : | ०९/०३/२०२६ |
| निकालपत्र सही केल्याची तारीख | : | ०९/०३/२०२६ |
| निकालपत्र अपलोड केल्याची तारीख | : | ०९/०३/२०२६ |

**स्वाक्षरीत /–**

वि.म. घुंगरड
लघुलेखक श्रेणी – ३